
# साबळे फार्मसी महाविद्यालयाचे जीपॅट परीक्षेत यश



**सासवड :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी, सासवड येथील अंतिम वर्ष बी फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी जीपॅट परीक्षेत घवघवीत यश संपादित केले. नॅशनल टेस्टिंग एजन्सी कडून घेण्यात येणारी ग्रॅज्युएट फार्मसी ॲप्टिट्यूड टेस्ट या परीक्षेचा निकाल १९ मार्च २०२१ रोजी जाहीर करण्यात आला. यामध्ये महाविद्यालयाच्या ८ विद्यार्थ्यांनी बाजी मारली. हि परीक्षा फार्मसी अभ्यासक्रमांच्या पदव्युत्तर वर्गांना प्रवेश घेण्यासाठी देशपातळीवर घेतली जाते, अशी माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांनी दिली. तसेच पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव संदीप कदम, खजिनदार मोहनराव देशमुख, उपसचिव एल. एम. पवार, व प्रशासकीय सहसचिव ए. एम. जाधव यांच्याकडून गुणवंत विद्यार्थ्यांचे व महाविद्यालयातील सर्व शिक्षकांचे कौतुक करण्यात आले.

# जामखेडचा आठवडे बाजार बंद मार्केट मध्ये शुकशुकाट

**जामखेड :** जामखेड मध्ये करोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता जिल्हाधिकारी यांनी अहमदनगर जिल्ह्यातील सर्व

सकाळ

पुणे, बुधवार, १७ मार्च २०२१

# रितुषा झगडे हिचे नृत्य स्पर्धेत यश



**गराडे, ता. १६ :** सासवड (ता. पुरंदर) येथील शेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये द्वितीय वर्ष बी फार्मसीमध्ये शिकत असणाऱ्या रितुषा झगडे या विद्यार्थिनीने डॉ. होशी भिवंडीवाला, फौंडेर डीन अँड डायरेक्टर ऑफ एन.आय.इ.एम. मुंबई यांच्या अंतर्गत घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेत प्रावीण्य मिळविले. राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव संदीप कदम, खजिनदार मोहनराव देशमुख, उपसचिव एल. एम. पवार व प्रशासकीय सहसचिव ए. एम. जाधव, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांनी तिचे अभिनंदन केले.

सकाळ

पुणे, गुरुवार,
२५ मार्च २०२१

# 'साबळे फार्मसी'ची जीपॅट परीक्षेत बाजी

**गराडे :** सासवड (ता. पुरंदर) येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी अंतिम वर्ष बी फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी जीपॅट परीक्षेत घवघवीत यश संपादित केले. 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी'कडून घेण्यात येणारी जीपॅट म्हणजे 'ग्रॅज्युएट फार्मसी ॲप्टिट्यूड टेस्ट' या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. यामध्ये महाविद्यालयाच्या ८ विद्यार्थ्यांनी बाजी मारली. ही परीक्षा फार्मसी अभ्यासक्रमांच्या पदव्युत्तर वर्गांना प्रवेश घेण्यासाठी देशपातळीवर घेतली जाते, अशी माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांनी दिली. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव संदीप कदम, खजिनदार मोहनराव देशमुख, उपसचिव एल. एम. पवार व प्रशासकीय सहसचिव ए.एम. जाधव यांच्याकडून गुणवंत विद्यार्थ्यांचे व महाविद्यालयातील शिक्षकांचे कौतुक केले.



पोस्टर प्रदर्शनात यश मिळविणाऱ्या मयूरी थोरात हिला प्रमाणपत्र देताना मान्यवर.

# पोस्टर प्रदर्शनात मयूरी थोरात तृतीय

**बारामती :** डेलोनिक्स सोसायटीच्या बारामती कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये प्रथम वर्षामध्ये शिक्षण घेणाऱ्या मयूरी थोरात या विद्यार्थिनीने एस.जी.आर.एस. कॉलेज ऑफ फार्मसी सासवड येथे नुकत्याच पार पडलेल्या दोन दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेत पोस्टर प्रदर्शनात तृतीय क्रमांक मिळविला. 'ई ब्युरेट - टाइट्रेट टू पर्फेक्शन' या विषयावर पोस्टर तिने सादर केले होते. सदरील पोस्टर तिने प्राचार्य डॉ. राजेंद्र पाटील व प्रा. श्रीकृष्ण बावकर यांच्या मार्गदर्शनानुसार तयार केलेले होते. प्राचार्य डॉ. पाटील यांनी तिचे अभिनंदन करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी महाविद्यालय कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. कार्यशाळेत महाविद्यालयातर्फे सृष्टी शिंगटे , अस्मिता शिंगाडे, प्रांजली शिंदे व हरीश साखरे या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. महाविद्यालयास मिळालेल्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, विश्वस्त, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

सकाळ
रविवार,
२४ जुलै २०१६

# सासवडला पोस्टर प्रदर्शन

**सासवड** : माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त सासवड (ता. पुरंदर) येथे वाहनांची मोफत प्रदूषण (पीयूसी) चाचणी, पोस्टर प्रदर्शन, वृक्षारोपण, चित्रकला, निबंध स्पर्धा आदी उपक्रमांचे वाघिरे महाविद्यालय व परिसरात आयोजन करण्यात आले होते.

या वेळी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे पी. ई. कुलकर्णी, माजी आमदार अशोक टेकवडे, प्राचार्य तानाजी साळवे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष शिवाजी पोमण, योगेश फडतरे, ॲड. मानसी जगताप, संतोष जगताप, हेमंतकुमार माहूरकर, दत्ता चव्हाण आदी उपस्थित होते. संयोजन प्रा. दीपक जांभळे, एम. आर. गायकवाड यांनी केले. स्पर्धा परीक्षेस सुमारे ९३१ विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला. संयोजन प्रा. वाव्हळ, प्रा. लांडगे यांनी केले. पोष्टर प्रदर्शनात तब्बल १०४ विद्यार्थी सहभागी झाले होते. संयोजन एस. ए. शिंदे यांनी केले.



**सासवड (ता. पुरंदर) : वाघिरे महाविद्यालयाच्या आवारात आयोजित करण्यात आलेले वाहनांचे मोफत प्रदूषण चाचणी शिबिर.**

# साबळे महाविद्यालयात विविध ऑनलाइन उपक्रम

गराडे, ता. १७ : पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शेठ गोविंद रघुनाथ साबळे पदवी व पदविका औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात ऑनलाइन पद्धतीने सायंटिफिक ई-पोस्टर, फोटो कोलाज स्पर्धा, सूर्यनमस्कार, धावणे, सायकलिंग, चालणे आदी विविध उपक्रम राबविण्यात आले.

सध्या कोरोनामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मर्यादा आल्या आहेत. यावरच मात करण्यासाठी महाविद्यालयाने ऑनलाइन पद्धतीने विविध उपक्रमांचे आयोजन केले. यामध्ये बुद्धीला चालना आणि विद्यार्थ्यांना असणाऱ्या माहितीच्या आधारावर सायंटिफिक ई- पोस्टर स्पर्धा घेण्यात आली.

संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव संदीप कदम, खजिनदार मोहनराव देशमुख, उपसचिव एल. एम. पवार व प्रशासकीय सहसचिव ए. एम. जाधव यांनी महाविद्यालयाचे अभिनंदन केले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. स्मिता पवार, प्रा. विशाखा गायकवाड, प्रा. सागर भिसे, प्रा. जयश्री जगताप, प्रा. गणेश निगडे, प्रा. हनुमंत पाटील यांनी या उपक्रमांचे आयोजन केले.

दैनिक सकाळ : दत्ता भोंगळे

आहे. या साहित्याची परस्पर विल्हेवाट लावल्याचा आरोप नागरिकांनी व शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी केला होता. याबाबतचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर पंचायत समिती प्रशासनाने चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

## साबळे महाविद्यालयात वेबिनार

**गराडे :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शेठ गोविंद रघुनाथ साबळे पदवी औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय व शेठ गोविंद रघुनाथ साबळे पदविका औषधनिर्माणशास्त्र येथे 'सतर्क भारत, समृद्ध भारत' या अंतर्गत 'सायबर क्राइम'वर वेबिनार घेण्यात आला. या वेळी ऑनलाइन पद्धतीने गुन्हे कसे घडतात, त्यात व्हॉट्सअॅप, फेसबुक, ई-मेल तसेच बँकेचे व्यवहार यातील माहितीचा गैरवापर करून गुन्हे केले जातात. यात इंटरनेट वरच्या माहितीचा बऱ्याच प्रमाणात वापर केला जातो. यावर काय व कसे उपाय करून गुन्ह्याची कशी नोंदणी करावी या विषयी अॅड. गणेश उरणे यांनी सांगितले. 'राष्ट्रीय एकता दिवस' या अंतर्गत महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी राष्ट्रीय एकतेची प्रतिज्ञा घेतल्याचे प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांनी सांगितले. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी ऑनलाइन उपस्थित होते. प्रा. जयश्री जगताप, प्रा. विशाखा गायकवाड प्रा. प्राजक्ता धुमाळ, प्रा. श्वेता फडतरे यांनी आयोजन केले. सूत्रसंचालन प्रा. गणेश निगडे यांनी केले. तर प्रा. हनुमंत पाटील यांनी आभार मानले.

# 'अंतराळ संशोधनात भारत महत्त्वाची भूमिका पार पाडणार'

**मंचर, ता. २ :** अंतराळ संशोधनाबाबत ... चर्चासत्र घेण्यात आले. ... म्हणाले, ""अवकाश

सकाळ : दत्ता भोंगळे

# विविध उपक्रम

## साबळे महाविद्यालयात व्याख्यान

**गराडे** : सासवड (ता. पुरंदर) पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शेठ गोविंद रघुनाथ साबळे पदवी व पदविका औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयात मराठी भाषादिन ऑनलाइन पद्धतीने साजरा करण्यात आला. यानिमित्त व्याख्यान व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त मराठी भाषा दिन साजरा केला जातो.

यावेळी पुण्याच्या रयत प्रबोधिनीचे संचालक सचिन पवार व प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. जयश्री जगताप, प्रा. अश्विनी कुंजीर, प्रा. शीतल जगताप यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा. जयश्री जगताप यांनी केले. तर आभार प्रा. हर्षा शेंडकर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व विद्यार्थी ऑनलाइन उपस्थित होते.

लोकमत पुणे, बुधवार, दि. २१ डिसेंबर २०१६




सासवड येथील फार्मसी महाविद्यालयात विज्ञान प्रदर्शनात प्रकल्पांचे पाहणी करताना मान्यवर.

# सासवडला फार्मसी महाविद्यालयात प्रदर्शन

**सासवड :** येथील शेठ गोविंद रघुनाथ साबळे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच जिल्हा शिक्षण मंडळाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विज्ञान प्रदर्शन आयोजित केले होते.

विविध विषयांवर प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले होते. या प्रदर्शनात रेश्मा कामठे यांनी सादर केलेल्या ई-कचरा व्यवस्थापन या प्रकल्पाला प्रथम क्रमांक मिळाला. तर, परमेश्वर जाधव यांना द्वितीय क्रमांक मिळाला.

हृषीकेश जगताप यांना तृतीय क्रमांक मिळाला. त्यांनी अनुक्रमे 'उद्योग व नॅनो टेक्नॉलॉजी आणि मानवी जीवन' या विषयावर प्रकल्प सादर केले होते.

डॉ. एन. एम. पाटील, डॉ. व्ही. आर. उंडाळे, प्रा. विशाखा गायकवाड यांनी परीक्षक म्हणून काम पहिले. संस्थेचे सचिव पी. ई. कुलकर्णी, एन. जी. चांदेरे, प्राचार्य डॉ. अशोक भोसले, वाघिरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तानाजी साळवे यांच्या हस्ते करण्यात आले. (वार्ताहर)

संध्या

बुधवार, १५ जानेवारी २०२०

# साबळे फार्मसी महाविद्यालयामध्ये दोन दिवशीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन

सासवड: सासवड येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शेठ गोविंद रघुनाथ साबळे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात सिस्टिमॅटिक अँप्रोच टू स्पेक्टरल इंटरप्रेटेशन'' या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुरस्कृत दोन दिवशीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेचे उदघाटन डॉ.बी.एस.कुचेकर – प्राचार्य व अधिष्ठाता महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी, पुणे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी सिस्टिमॅटिक अँप्रोच टू स्पेक्टरल इंटरप्रेटेशन'' या विषयावरती मार्गदर्शन करून त्याचे महत्व पटवून दिले. डॉ.वैशाली शिंदे यांनी सिस्टिमॅटिक अँप्रोच टू स्पेक्टरल इंटरप्रेटेशन'' या विषयाचे विविध महत्व व या क्षेत्रातील तसेच औषधनिर्माणशास्त्रातील त्याचे होणारे फायदे सांगितले. प्राध्यापक डॉ. एस.वाय.गाभे यांनी फार्मास्युटिकल मायक्रोबायोलॉजीतील संशोधनात स्पेक्टरल इंटरप्रेटेशनचे उपयोग समजावून सांगितले.




यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.वाय.पाटील यांनी महाविद्यालयात होणाऱ्या विविध कार्यशाळेचे व सिस्टिमॅटिक अँप्रोच टू स्पेक्टरल इंटरप्रेटेशन'' चे औषधनिर्माणशास्त्रातील महत्व व विध्यार्थ्यांना त्याचा कसा उपयोग होतो याची सविस्तर माहिती सांगितली. या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यासाठी डॉ.शशिकांत पठाण, डॉ.डी.जी.हिंगणे, डॉ.आर.पी.मराठे हे मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यशाळेचे औचित्य साधून महाविद्यालयात पोस्टर प्रेसेंटेशनचे हि आयोजन करण्यात आले होते. सदर पोस्टर प्रेसेंटेशनचे उदघाटन व परीक्षण डॉ.आर.पी.मराठे यांनी केले. पोस्टर प्रेसेंटेशन स्पर्धेमध्ये शमा आफळे , पुणे हिला प्रथम क्रमांक, कु.नयना मिरके – फार्मसी कॉलेज, सासवड हिला द्वितीय व डेलोनिक्स फार्मसी कॉलेज, बारामती महाविद्यालयाची कु.मयुरी थोरात हिला तृतीय क्रमांक मिळाला.

सदर कार्यशाळेस पुणे, सातारा, नगर व नाशिक येथून ७५ पदव्यूत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. सदर कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ.राजश्री चव्हाण आणि आभार प्रदर्शन प्रा.जयश्री जगताप यांनी केले. या कार्यशाळेचे आयोजन प्रा.अमोल काळे व प्रा.जयश्री जगताप यांनी केले.

प्रभात पुणे, गुरुवार, दि. २० डिसेंबर २०१८

# साबळे महाविद्यालयात व्याख्यानमाला उत्साहात

**सासवड** - येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शेठ गोविंद रघुनाथ साबळे औषध निर्माण शास्त्र महाविद्यालय येथे माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. त्याअंतर्गत महाविद्यालयतील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी संवाद कौशल्य, आपत्ती व्यवस्थापनामधील फार्मेसी विद्यार्थ्यांचा सहभाग तसेच ताणतणाव व्यवस्थापन आदि विषयांवर अनुक्रमे प्रा. बी. व्यकट, डॉ. राजेंद्र जगताप आणि प्राचार्या डॉ. सुषमा भोसले यासारख्या तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात आले होते. तसेच महाविद्यालयतील विद्यार्थ्यांनी विविध विषयावरील उपकरणे विज्ञान प्रदर्शनात सादर केली. याप्रसंगी जितेंद्र घोडके, बाळासाहेब भिंताडे उपस्थित होते. या विविध उपक्रमांचे आयोजन महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. आर. वाय. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालान प्रथम वर्ष पदविका मधील उल्हास काळे, शुभांगी कामथे, अपर्णा बिरामने, वृषाली कुंभार, दिव्या लाळे, चैताली जगताप आदी विद्यार्थ्यांनी केले. पदविका विभाग प्रमुख प्रा. विशाखा गायकवाड, प्रा. रूपली जाधव, प्रा. हनुमंत पाटिल, तसेच शिक्षकेत्तर सेवक आणि विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. दिपाली जगताप व प्रा. मंजुश्री पानसरे यांनी केले.

लोकमत
पुणे सोमवार,
दि. २३ जानेवारी २०१७ ७

23/01/2017

# सासवडचे फार्मसी महाविद्यालय कबड्डी स्पर्धेत विजयी

**सासवड :** येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शेठ गोविंद रघुनाथ साबळे औषध निर्माणशात्र महाविद्यालय व इंडियन फार्मास्युटिकल पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने येथे जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील विविध औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय मुलांच्या गटातून १६ संघांनी भाग घेतला.

मुलींच्या गटातून ६ महाविद्यालयीन संघ सहभागी झाले होते. मुलांच्या गटात सासवडच्या फार्मसी महाविद्यालयाचा संघ विजेता, तर अभिनव एज्युकेशन सोसायटी महाविद्यालयाचा संघ उपविजेता ठरला. मुलींच्या गटातून सासवडच्या फार्मसी महाविद्यालयाचा संघ विजेता, तर भारती विद्यापीठाच्या पूना कॉलेज ऑफ फार्मसीचा संघ उपविजेता ठरला. उद्घाटनप्रसंगी स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य प्रा. दिगंबर दुर्गाडे, संस्थेचे उपसचिव पी. ई. कुलकर्णी, वाघिरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तानाजी साळवी, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक भोसले, प्रा. नीलेश जगताप, प्रा. श्रीकांत बोराडे, उपप्राचार्य डॉ. मीनाक्षी देवधर, प्रा. विशाखा गायकवाड, विद्या म्हस्के उपस्थित होते. गेली दोन वर्षे विद्यार्थ्यांना खेळात प्रोत्साहन देण्यासाठी विविध स्पर्धा आयोजित करण्यात येत असल्याचे डॉ. भोसले यांनी सांगितले. विद्यार्थ्यांची कार्यक्षमता वाढविण्यास मैदानी खेळ आवश्यक आहे.

कबड्डी लोकप्रिय असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर या खेळाला स्थान मिळाले आहे, असे प्रा. दुर्गाडे यांनी सांगितले. या स्पर्धेचे आयोजन प्रा. वैभव शिळीमकर, प्रा. विपुल धसाडे, प्रा. नीलेश भोसले, प्रा. स्वाती मुथा, प्रा. जयश्री जगताप, प्रा. रुपाली जाधव आणि शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांनी केले. (वार्ताहर)